# अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याची प्रेरणा देणारा साहित्यिक : अण्णा भाऊ साठे

**डॉ. नामदेव केशवराव वाघमारे**

**भूगोल, विभाग प्रमुख**

**इंदिरा गांधी महाविद्यालय, सिडको नांदेड.**

भारतीय समाजव्यवस्थावर्णभेदाने व जातीभेदाने निर्माण झालेली विषमतावादी व्यवस्था आहे. या मनुवादी विषमतामूलक समाजव्यवस्थेत माणूस कर्तृत्वाने नव्हे तर जातीने श्रेष्ठ व कनिष्ठसमजलाजातो. भारतीय मनुवादी समाजव्यवस्था विशिष्ट जातीत जन्माला आलेल्या लोकांना धनसंपन्न, सत्तासंपन्न व प्रतिष्ठासंपन्न बनवते. तर विशिष्ट जातीत जन्माला आलेल्या लोकांना दरिद्री, अज्ञानी, सत्ताहीनवप्रतिष्ठाहीनबनवून त्यांचे माणूसपणनाकारून गुलाम व लाचार बनवते.वर्ण व जातीवर आधारलेल्या विषमतामूलक समाजव्यवस्थेला गाडून टाकून समतावादी समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी अनेकदीन-दलित व बहुजन समाजातील महामानवांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पितकेलेले आहे.या दीन-दलितव बहुजन समाजातीलमहामानवांचा खरा इतिहास मनुवादी लेखकांनी व जातीयवादी समाजव्यवस्थेने लपून उच्च जातीतील कर्तत्वहिन लोकांचा खोटा इतिहास लिहून त्यांना प्रसिद्धी देण्याचे व बहुजन समाजातील महामानवांना उपेक्षित ठेवलेले आहे.त्यामुळेच बहुजन समाजातील महामानवांचे समतावादी व मानवी कल्याणाचे कार्यसर्वसामान्य जनतेपर्यंतपोहचूशकले नाही. मनुवाद्यांनीलिहिलेलामनुवाद्यांचा खोटा इतिहास व बहुजन महामानवांचा लपवलेला खरा इतिहास बहुजन समाजातीलसाहित्यिक, अभ्यासक व संशोधकांनी शोधून मनुवाद्यांचा खोटारडेपणासर्वसामान्य जनतेसमोर आणणे आवश्यक आहे.बहुजन समाजातील क्रांतिकारकांचा, महामानवांचा व साहित्यिकांचा खरा इतिहास जातीवादी मानसिकतेतून लपवण्याचे जे कार्य केलेले आहे त्याचाच बळी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठेही ठरलेले आहेत.

साहित्यविश्वातील एक चमचमणारा हिरा अण्णाभाऊ साठे यांना मनुवादी साहित्यिकांनी जातीचा आधार घेऊन उपेक्षित ठेवले.केवळ दीड दिवस शाळेत जाऊनशिक्षण

क्षेत्रातील उच्च पदव्या घेऊन साहित्य लिहिणा-यांना लाजवील असे साहित्य अण्णाभाऊ साठे यांनी लिहिले.कोणत्याही प्रकारचे औपचारिक शिक्षण न घेता साहित्यातील सर्व प्रकारावर प्रभावीपणे लेखन करणारा भारतातील नव्हे तर जगातील हा एकमेव साहित्यिक असावा. असे असतानाही मराठी साहित्यातील या चमचमणा-याहि-याला जातीयवादी साहित्यिकांनी उपेक्षित ठेवले, ही मोठी शोकांतिका म्हणावीलागेल. जातीवादी समाजव्यवस्थेने ज्यांना शोषित, पीडित, वंचित ठेवले,ज्यांच्यावर अमाणूस अन्याय, अत्याचार केला, माणूस असूनही त्यांचेमाणूसपण नाकारून त्यांना गुलाम व लाचार बनवले. त्या दीन-दलित, शोषित, वंचितांचे दुःख, वेदना मराठी साहित्यात व जगाच्या वेशीवर टांगूनदीन-दलित, वंचितांना आपल्या साहित्यात नायकत्व देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य अण्णाभाऊ साठे यांनी केले. जे याअगोदर मराठी साहित्याततसे झालेले नव्हते.

अण्णाभाऊ साठे साहित्यविश्वातील चमचमणारा एकहिरा असतानाहीकेवळ जातीयवादी मानसिकतेतून त्यांना जाणूनबुजून उपेक्षित ठेवण्याचे कार्य केले. या मनुवादी साहित्यिकांनामला प्रश्न विचारा वाटतो की, तुम्ही शिक्षणातील उच्च पदव्या घेऊनही अण्णाभाऊ साठे यांच्यातोडीचेसाहित्यनिर्मितीकरू शकलात का ?मराठी साहित्यातील सर्व प्रकारच्या साहित्यावर दर्जेदार लिखाण अण्णाभाऊ साठे यांनी केलेले असूनही मराठी दिवस मात्र अण्णाभाऊ साठेंच्या नावाने साजरा होत नाही,ही फारमोठी शोकांतिका आहे. जातीय मानसिकतेतून अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य उपेक्षित ठेवण्याचा कितीही प्रयत्न केला तरी ज्याप्रमाणे सूर्याला झाकता येत नाही, त्याप्रमाणेअण्णाभाऊ साठे यांचे साहित्यफार काळलपवून उपेक्षित ठेवता येत नाही. अण्णाभाऊ साठे यांच्याकाही साहित्याचे जगातील व भारतातील अनेक भाषांमध्ये भाषांतर करण्यात आलेले आहे.याचा अर्थ अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याला जागतिक पातळीवर मान्यता मिळालेली आहे. दीन-दलित,शोषित, पीडितव वंचितांना अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याने दिली.दीन-दलित, कष्टकरी, कामगार, शोषित, पीडितवउपेक्षित माणसा तु गुलाम नाहीस तर जगाचा चालक-मालक आहेस, जग तुझ्यातळ हातावर तरलेले आहे.तूचजग बदलणारा क्रांतिकारकआहेस,तूचजगातील क्रांतीचा उदगाता आहेस. हा श्रमाला प्रतिष्ठा देणारा महत्त्वाचा

विचार अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून मांडला. हा विचार अण्णाभाऊ साठे यांच्या अगोदर कोणीही मांडलेला नव्हता."कणसं खुडूनपोट भरता येते, पण कोणाची अब्रू लुटून पोट भरत नसतं."हे नैतिक तत्त्व "पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून, ती दीन-दलित, कष्टकरी, कामगारांच्या तळहातावर तरलेली आहे". हा विज्ञानवाद आणि अन्याय करायचा नाही व सहनही करायचा नाही,हे न्यायिक तत्व अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून अतिशय प्रभावीपणे मांडलेला आहे.म्हणून अण्णाभाऊ साठे हेविद्रोही, विज्ञानवादी, वास्तववादी व परिवर्तनवादी लेखक आहेत.अण्णाभाऊ साठे यांनी संपूर्ण बहुजन समाजाला अन्याय, अत्याचाराविरुद्ध संघर्ष करण्याची व बंड करून उठण्याची प्रेरणा आपल्या साहित्यातून दिलेली असताना, मातंग समाजावर मात्रमोठ्याप्रमाणात अन्याय होत आहेत.मातंग समाज हे अन्याय, अत्याचार प्रतिकार न करता सहन करत आहे.त्याविरुद्ध संघर्ष व बंड करत नाही.कारण अण्णा भाऊ साठे यांचे विचार मातंग समाजाने स्वीकारलेले नाहीत. ते स्वीकारले असते तर मातंग समाजाने एकत्र येऊन अन्याय, अत्याचारा विरुद्ध लढा उभा केला असता.

भारताला स्वातंत्र्य मिळून सात दशकं पूर्ण झालेली असतानाही मातंग समाजामध्ये फारशी सुधारणा झालेली नाही. कारण मातंग समाजामध्ये शिक्षणासंदर्भात फारशी जनजागृती नाही, तसेच प्रचंड अंधश्रद्धा व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार मातंग समाजाने स्वीकारलेलेनाहीत.मातंग समाजाला प्रगतीच्या दिशेने जाण्यासाठी हिंदू धर्मातील अनिष्ट रूढी परंपराम्हणजेच अंधश्रद्धेला मूठमाती देणे आवश्यक आहे.परिवर्तनवादी विचाराच्या महामानवांचे, क्रांतिकारकांचे व साहित्यिकांचे अनुयायित्व पत्करणे आवश्यकआहे. मातंग समाज जर परिवर्तनवादी क्रांतीपिता लहुजी साळवे,परिवर्तनवादी मुक्ता साळवे, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठेयांचेआम्ही अनुयायी आहोत, असे म्हणत असेल तरयापैकी कोणाचेही विचार मातंग समाजाने आजपर्यंत स्वीकारलेले दिसत नाहीत.क्रांतीपिता लहुजी साळवे यांनी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्यापरिवर्तनवादी समाजकार्यास व शिक्षण कार्यास मोलाचे सहकार्य केले. म्हणजे क्रांतीपिता लहुजी साळवे हे परिवर्तनवादी विचाराचे होते. मुक्ता साळवे या चिमुकलीने येथील

मनुवादीसमाज व्यवस्थेला आमचा धर्म कोणता ? हा प्रश्न विचारला. तर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी दीन-दलित, कष्टकरी, कामगार, उपेक्षितांना आपल्या साहित्यातनायकबनवू अन्याय, अत्याचाराविरुद्ध संघर्ष करण्याची प्रेरणा दिली.यापैकी कोणाचेही विचार मातंग समाजानेस्वीकारलेले नाहीत. त्यामुळे मातंग समाज हा या महामानवांच्याजातींचा असू शकतो. परंतु विचारांचाअनुयायी होऊच शकत नाही.महामानवाचे अनुयायी होण्यासाठी केवळ त्यांच्या जातीचे असणे एवढीच पात्रता नसते तर त्यांच्या विचारांचे असणे व विचारांचे अनुसरण करणे आवश्यक असते.सध्या महामानवांच्या जातीच्या अनुयायापेक्षा विचारांच्या अनुयायांची खरी गरज आहे.मातंग समाजाने विकासाची दिशा दाखवणा-या महामानवांच्या परिवर्तनवादीविचाराऐवजीसमाजाला अस्पृश्य, लाचारव गुलाम बनवणा-या मनुवादी समाजव्यवस्थेचे विचारमातंग समाज काटेकोर पालन करत आहे.त्यामुळेचमातंग समाज फारशी प्रगती करू शकला नाहीवअन्यायाविरुद्ध संघर्षव बंड करू शकत नाही.मला प्रश्न पडतो की, ज्याधर्माने मातंग समाजाला अस्पृश्यता, लाचारी व गुलामी दिली, जाती, धर्माच्या नावानेअमानुष अन्याय-अत्याचार केले,समाजाच्या हजारो पिढ्या बरबाद केल्या,जो धर्महजारो वर्षापासूनसमाजाच्या प्रगतीसाठी अडथळाठरला त्यामनुवादी धर्माचे तत्व मातंग समाज काटेकोरपणे पालन करतो आणि ज्या महामानवांनी तुम्हाला माणूस बनवले, तुमच्या प्रगतीसाठी संपूर्ण आयुष्य समर्पण केले,तुमच्या जीवनाचे सोने केले,ज्यांचे विचार प्रगतीच्या दिशेने नेणारे असतानाही ते स्वीकारले जात नाहीत.याचाच अर्थ मातंग समाजाला लाचारी वगुलामी सोडून विकासाच्या दिशेने वाटचाल करावयाची नाही.

मनुवादी समाजव्यवस्थेने तुम्हाला धर्माच्या नावाखाली अस्पृश्य,गुलाम, लाचारबनवून तुमचे माणूसपण नाकारले तेव्हा क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले आणि विश्वरत्न, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तुम्हाला माणूसपण प्राप्त करून दिले. हे मातंग समाजाने विसरता कामा नये.मातंग समाजाला प्रगतीच्या दिशेने वाटचाल करावयाची असेल तर क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार स्वीकारून त्यांचे अनुकरण करण्याशिवाय दुसरा कोणताच पर्याय नाही.एखाद्या महामानवाचे विचार जर समस्त मानवजातीच्या

कल्याणासाठी उपयोगी असतील, तर त्या महामानवाची जात लक्षात न घेता त्यांच्या विचाराचे अनुसरण जो समाज करेल तोच समाजप्रगती करू शकतो.

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांनी दीन-दलित समाजाचीदयनीय अवस्था ही केवळ शिक्षणाच्या अभावामुळे मुळेच झालेली आहे.शिक्षणाशिवाय दीन-दलित व बहुजनांची प्रगती होऊ शकत नाही. हे लक्षात घेऊन धर्माच्या ठेकेदारांचा प्रचंड विरोध पत्करून दीन-दलित व बहुजनांसाठी भारतात पहिली शाळा काढून दीन-दलित बहुजनांच्या आयुष्यातील वर्षानुवर्षाचा अज्ञानाचा अंधकार दूर करून त्यांचे जीवन प्रकाशमान केले.विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतःचा संसार उद्ध्वस्त करून भारतातील समस्त मानव जातीच्या उद्धारासाठी संपूर्ण आयुष्य समर्पित केले. हे कार्य करताना त्यांची चार मुले पोटभर अन्न न मिळाल्याने व औषध उपचारासाठी पैसेन मिळाल्याने मृत्यू झाली. याची जाणीव बहुजन समाजालाविशेषतः मातंग समाजाला आहे का ? ज्या महामानवानेसंपूर्ण आयुष्याचा एक नाएकक्षण दीन-दलितव बहुजनांच्या उध्दारासाठी खर्च केला.ज्यांचे विचारसमस्त मानव जातीला प्रगतीच्या दिशेने नेणारे आहेत.त्या महामानवांच्या विचाराकडे दुर्लक्ष करणारा समाज कधीच प्रगती करू शकत.

मातंग समाज हिंदूधर्मातील देव-देवतांची मोठ्या श्रद्धेने पूजाअर्चा करत असतो. त्यांना मला विचारावे वाटते की, भारतीय राज्यघटना लागू होण्याच्या अगोदर मातंग समाजावर व इतर दलित समाजावरअमाणूसअन्याय अत्याचार झाले,हे अमाणूस अन्याय अत्याचारहिंदूधर्मातील तेहतीस कोटी दिवाने का थांबवले नाहीत. तुमच्याआमच्यासाठीआरक्षण,नोक-याका दिल्या नाही. ज्यांनी तुमच्यासाठी काहीच केलेले नाही,त्यांची पूजाअर्चा नित्यनेमाने करता आणि ज्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर तुमच्यासाठी संपूर्ण आयुष्य समर्पित केले व विकासाचा मार्ग दाखवला त्यांच्या विचाराकडे मात्रदुर्लक्ष करता, ही किती मोठी शोकांतिका आहे. मातंग समाजाच्याच नव्हे तर संपूर्ण बहुजन समाजाच्या जीवनाचे खरे शिल्पकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरच आहेत. हे मातंग समाजाने विसरता कामा नये.मातंग समाजाने या महामानवाला आपल्या जीवनातून वगळून जीवन जगण्याचे ठरवले तर, मातंग समाजाच्या जीवनाला शून्य इतकेही मूल्य

नसेल. ही गोष्ट मातंग समाजाने सदैव लक्षात ठेवली पाहिजे. ज्यांनी तुम्हाला अस्पृश्य, गुलाम व लाचार बनवण्यासाठी,तुमच्या पिढ्यानपिढ्या बरबाद करण्यासाठी धर्माच्या नावाखाली मानवताहीन नियम बनवले. त्यांचे जर आपण काटेकोर पालन करत असाल, तर पुन्हा मागचे दिवस यायला फार वेळ लागणारनाही.ही गोष्ट मातंग समाजाने सदैव लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

अण्णाभाऊ साठे यांच्या समस्त साहित्याचा आढावा घेतल्यानंतर असे लक्षात येते की सुरुवातीच्यासाहित्यात वर्ग लढ्याचे क्रांतिकारी स्वरूप असल्याचे स्पष्ट होते त्यानंतर मात्र वर्ग व वर्ण यातील भेद अण्णाभाऊ साठेंच्या लक्षात येऊ लागला हिंदू धर्माच्या समाजव्यवस्थेचा जात हा केंद्रबिंदू आहे. अस्पृश्य जातीच्या वाट्याला जातीवादी समाजव्यवस्थेने खूपच हलाखीचे जीवन जगण्याची वेळ आणलेली आहे. वर्ग वजात यामध्ये फरक आहे.त्यांच्यामध्ये सामाजिक अभिसरण होऊ शकत नाही. माणसांच्या विचारांनाही चातीचे ग्रहण लागलेली आहे. जोपर्यंत वर्णभेद व जातीभेद नष्ट होत नाही तोपर्यंत साम्यवादी वर्ग व्यवस्थेवर आधारलेला लढा यशस्वी होऊ शकत नाही. हे अण्णाभाऊ साठे यांच्या लक्षात आल्यानंतर ही वर्णवादी व जातीवादी व्यवस्था नष्ट करण्यासाठी अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून वर्ण व जातीवादी विषमतामूलक समाज व्यवस्था नष्ट करून समतावादी समाजव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठीसमाजसंघर्षमय मांडणी केलेली आहे. त्याच काळात स्वातंत्र्याला समांतर अशी वर्णवादी व जातीवादी व्यवस्थेला विरोध करणारी व भारतीय समाजव्यवस्थेत समता प्रस्थापित करणारी चळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली चालू होती. ही चळवळ समतेसाठी, न्यायासाठी, स्वातंत्र्यासाठी, आत्मसन्मानासाठी, बंधुत्वासाठी व मानवी अधिकारासाठी चालू असल्याचे अण्णाभाऊ साठे यांच्या लक्षात आले.अण्णाभाऊ साठे कम्युनिस्टविचाराचे असले, तरी त्यांनी वर्णवादी व जातीवादी समाजव्यवस्थेने अन्याय-अत्याचार केलेल्या अन्यायग्रस्त उपेक्षित, कष्टकरीव कामगार यांचे चित्रण आपल्या साहित्यातून केलेले आहे.अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेले "जग बदल घालुनि घाव, सांगून गेले मला भीमराव"अशी मांडणी केली.तसेचदेशाला स्वातंत्र्य मिळाले परंतु दीन-दलितांच्या स्वातंत्र्याचे काय ? हा प्रश्न विचारण्यासाठी स्वातंत्र्याच्या दुस-

याच दिवशीअण्णाभाऊ साठे यांनीस्वातंत्र्या विरुद्ध मोर्चा काढून "ये आजादी झुटी है, देश कि जनता भुकी है, हा नारा दिला म्हणजे अण्णाभाऊ साठे यांना दीन-दलित समाजाचे स्वातंत्र्य अपेक्षित होते.याचा अर्थ अण्णाभाऊ साठे यांनीही विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विद्रोही व परिवर्तनवादी विचारस्वीकारलेले होते.म्हणून तरअण्णाभाऊ साठे यांनीआपलीसर्वश्रेष्ठ "फकीरा" ही कादंबरी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार विचारांना समर्पित केली व आपल्या साहित्यातून अन्यायाविरुद्ध संघर्षवबंडकरण्यासाठीचा विद्रोही व परिवर्तनवादी संदेशसाहित्याच्या माध्यमातूनसमाजाला दिला.या संदेशाचे पालन करावयाचे की नाही हे समाजाने ठरवले पाहिजे.मातंग समाजाने अण्णाभाऊ साठे व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विद्रोही विचार स्वीकारलेले नाहीत. त्यामुळेच सध्याला सर्वात जास्त अन्यायग्रस्त समाज म्हणून मातंग समाज जीवन जगत आहे. मातंग समाजावर होणा-या अन्यायाविरुद्ध मातंग समाज एकत्रित येऊन लढू शकत नाही. कारण मातंग समाजाला साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविद्रोही व परिवर्तनवादी विचारांचा विसर पडलेला आहे.त्यांच्याविद्रोही, परिवर्तनवादीव प्रगतीच्या दिशेने नेणारे विचार स्वीकारले तरच मातंग समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करेल, नाहीतर मातंग समाजाचे भवितव्य अंधकारमय आहे, याची सदैव आठवण ठेवणे आवश्यक आहे.